1180

NATIONAL ARCHIVES OF INDIA

1180
PREMA sandeśa.
Kārañjā (Berar dist.): Rāmacandra Vāsudeva Bhā,
[1931?].
8 p. 14 cm.
Nationalistic song in praise of Bhagat Singh. Copies
to be obtained from Sadāśiv Āpā, Secretary of
Kāraṇjā Congress Committee.
PP Mar B 20; PIB 6/22

॥ वंदेमातरम ॥

असे भगतसिंह रणवीर
ज्यांचे मन असवेना स्थीर ॥
क्रांतिचे काम केले ज्यांनी
वीर त्या भगत सिंहानी ॥
बंब कमाविले किसनसिंगाचे त्यांनी
त्यांचे वंशी जन्मा येवोनी ॥
असे वीर या तुम्ही होऊनी
मातेच्या उद्धारासी जाणा
असे असत दुसरे जगी कोण
पहाराज गुरु सुखदेव जाण ॥
नांव पुष्पांबर अजरामर केले ज्यान
भगत सिंहाच्या मित्रान ॥
आणा परक्यांचा फसा उडवा मौजेन
परक्यांचा फसा उडवा हौसेन॥
राष्ट्राच्या उद्धारा जाण
कमाविल नांव भगतसिंहान ॥
असे गांधीजीचे मत नाही जाण
तरी या खेळम सोडा ते धोरण ॥
की त्यास असे एकच कारण
ते अहिंसाधर्म दुसरे जाण ॥

दुसरे प्रजेचे संरक्षण हें काम
त्या करितां काम करा घ्यान॥
असे करा हिंदु मुसलमान
कट आपुले करा हो स्थापन ॥
तरकुन सांगे रामचंद्र हौसेन
हेंच आपलें करा संरक्षण ॥
असे केले भगत सिंहाच्या मिशान
कीं तुम्ही हो रणवीर या होऊन॥

मनी धीर धरी शोक आवरी जननी
भेटेन नव म हन्यांनीं ॥
किती पुंदेवी प्राणी असतील असले
जे अपराधा सण मेले ॥
या न्यायाची रीत मानवी असते
खरी ठरते किंवा चुकते ।
लाडका बाळ एकुलता,
फाशीची शिक्षा होतां,
कवटाळुनी त्याला माता ।
किंवा आक्रोशे रडतां केविल वाणी
भेटेल नव महिन्यांनीं ॥१

किती वेळ असा शोक करिसी गे अबला
दे निरोप मज जायाला ।
होईल पहा विफल तुझा आकांत
बाहेर उभे सशस्त्र ।
ते काळ्या सरकाराचें,
नच उलटे काळीज त्यांचे,
परि शरमिंदे मजाचे,
तुज पासोनिया नेतिल मज ओढोनी
भेटेल तव महिन्यांनी ॥ २
तुज सोडोनिया जाईन कागे माते
परि देह परस्वाधिन ।
वृद्ध बोलती हे बोल युक्त्या भावाचे
मम दोरबंड दंडाचे ।
अन्नपाणी सेऊनी इथले,
हे शरीर मी पोशियलें,
परतंत्री देश तो लोळें ।
स्वातंत्र मला मिळेल मग कोटोनी
भेटेल तव महिन्यांनी ॥ ३
कां परक्याला बोल उगीच लावावा
कुदैवाने धरिला दावा ।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लागेल कधीं सांग कुणाला जगतीं
या अळत्या विश्वांतीं ।
घेउनि उशाला साप,
लागेल कुणाला झोप,
हा सर्व ईश्वरी कोप,
ही परवशता करते भयंकर करणी
भेटेन मव महिम्यानीं ॥८॥
मज फांशाची शिक्षा दिधली जाण
न्यायाचा करुनी खून
या मरणाची मौज कशी मग असते
सांगेन तुला मी नाते
मी राजपुत्र दिलदार,
भोवती शिपाई चार,
घेउनी करी समशेर,
फर्माल अता स्वागत जन मैदानीं
भेटेन मव महिम्यानीं ॥९॥
प्रजवाडी तिथे सिंहासन निश्चित
त्या एका खांबावरती
मी वीर गर्जे लढेन मन का करती
दुसऱ्यांच्या वाटा करती

NATIONAL ARCHIVES OF INDIA

इच्छिली वस्तु घ्यायाला,
अधिकारी सैनातीला,
प्राणापरी अपतिल मजला,
या देशाची दौलत लोळे चरणीं
भेटेल नव महिन्यानीं ॥६

या सर्वांचे मजवरि भारी प्रेम
देतील अजी तालीम
हे वैभव मी विकत घेतलें साचें
देउनी मोल प्राणाचें ॥७

हा गळ्यांतला गळफांस,
देईल मजीमर त्रास,
लाभेल मुक्ति जीवास,
वर जाइन मी साथ जगा माझनी
भेटेल नव महिन्यानीं ॥८

या देहाची कर कशाला चिंता
होईल ते होवो त्याला
कुणि करुणेचे सागर हळहळतील
हसणारे ते हसतील
सर्पूनी न्हाणु माला,
प्रेमाचे घेउन त्याला,
मातीचा मोकळा पुतळा.

६ /

जाईन पहा क्षणांत मातिस मिळुनी
भेटेन नव महिन्यांनी ॥८

सांगतो तुला शपथ घेउनी आई
मरणाला भ्यालो नाहीं
आठवे मनीं श्री गीतेचे सार
कीं तनु नश्वर जाणार
या हृदयाचे मोजुनी ठोके,
बघ शांत कसे आहे ते,
वाईट वाटते इतुके ।
तव सेवेला अंतरलो मी जननी
भेटेन नव महिन्यांनी ॥ ९

माउली तुझा नव्हे नव्हे सुकुमार
पूर्वीचा दावेदार
तव सौख्याचे वाटेवर निर्मियले
दुःखाचे डोंगर अमले
नवमास भार वाहूनी,
बालपणी बहु जपूनी,
संसार दिला थाटूनी ।
परि घडलो मी वंचित अभागी प्राणी
भेटेल नव महिन्यांनी ॥ १०

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ॐ

मम बाळपणीं वृद्धपणीं बहु साल
आम्हाला सांभाळील
नव ममतेचे ते बोल एकले साचे
परि सारे उलटे झाले
माउली विनंती तुजला
सांभाळ तिला बाळाला,
नच बघवे तिकडे पजला
हा कठीण गमे प्रसंग मरणा दिनी
भेटेल नव महिन्यांनी ॥१२
दे जन्म मला मातृभूमीचे पोटी
पुन्हां पुन्हां मरण्यासाठी
मागणे हेच गांधीजीला,
मातृभूमि उद्धरण्याला,
स्वातंत्र्य रणी लढण्याला,
नव शुभ उदरीं जन्म शिवोनि
भेटेन नव महिन्यांनी ॥ १२
मग यमदुते नोटोनी त्याला नेले
लावयाचें होउनि गेले
परि त्या ठाई शब्द उमटती अजूनि
भेटेन नव महिन्यांनी ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

आंबाचा फुटतीच फार,
मृदुसम होईल फार,
हिमगिरीचा सागर भेट,
वाहि परवशता सुखकर आहा नाहीं
दे कुंज विहारि ग्वाही ॥ १३

NATIONAL ARCHIVES OF INDIA

8 32 JAN